दैनिक
महामेट्रो

Website: maha metro news.in
Facebook: facebook.com/mahametromedia
Instagram: com/mahametromedia
X Twitter: x.com/mahametromwdia
YouTube: www.youtube.com/@MahaMetroNews

वर्ष ४ थे : अंक : २० पुणे, बुधवार, १० सप्टेंबर २०२५
पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.04. ISSUE : 20 Pune, Wednesday, 10 September 2025
Pages : 4 PRICE : 3.00

चारचाकी गाडीसह साडेपाच लाखांचा ऐवज चोरीला

सासवड येथील सार्वजनिक रोडवर उभी असलेली चारचाकी गाडी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. गाडीसह तिच्यातील रोकड व साहित्य असा एकूण सुमारे साडेपाच लाखांचा ऐवज चोरीला गेला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

महत्वाचे...

अवैध शस्त्रांविरोधात कारवाई : ४५ जणांना अटक

पुणे । प्रतिनिधी

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार अवैध शस्त्रांविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत २० दिवसांत पोलिसांनी ५० पिस्टल, ७९ जिवंत काडतुसे, तसेच ११६ धारदार शस्त्रे जप्त केली. या कारवाईत ४० गुन्हे दाखल करून ४५ जणांना अटक करण्यात आली. धारदार शस्त्रांसाठी वेगवेगळ्या ९४ गुन्ह्यांमध्ये ६६ आरोपींना अटक झाली. गुन्हे शाखा युनिट-४ ने मोक्यातून सुटलेला पवन बनेटी याच्याकडून २ पिस्टल व २ जिवंत काडतुसे जप्त केली.

सराईत गुन्हेगार साहिल वायदंडेवर एमपीडीए कारवाई

पुणे । प्रतिनिधी

पद्मावती-तळजाई परिसरात दहशत माजवणारा सराईत गुन्हेगार साहिल गणेश वायदंडे (वय २५) याच्यावर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी एमपीडीए अंतर्गत कारवाई केली आहे. त्याला एक वर्षासाठी वर्धा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. साहिलवर गंभीर स्वरुपाचे पाच गुन्हे असून, दहशत व मारहाणीमुळे नागरिक तक्रार देण्यास टाळाटाळ करत होते. तो १२ ऑगस्टपासून फरार होता, मात्र पोलिसांनी त्याला ८ सप्टेंबर रोजी स्वारगेट भागातून ताब्यात घेऊन कारागृहात रवानगी केली.

महिला अटक – शेजाऱ्याला मारहाण

पुणे । प्रतिनिधी

विश्रामबाग येथे किरकोळ कारणावरून एका महिलेने शेजाऱ्याला मारहाण केली. आरोपी अंजली पांडुरंग सातव हिला पोलिसांनी अटक केली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरफोडी करून २.९६ लाखांचा ऐवज लंपास

पुणे । प्रतिनिधी

तळेगाव दाभाडे येथे चोरट्यांनी घरफोडी करून २.९६ लाखांचा ऐवज चोरून नेला. फिर्यादीच्या घराचा दरवाजा उचकटून आत प्रवेश करून सोन्याचे दागिने आणि रोकड असा ऐवज लंपास करण्यात आला आहे.

दगडूशेठ गणपती मंदिराच्या गाभाऱ्यात मंगळसूत्र चोरीस

पुणे । प्रतिनिधी

दगडूशेठ गणपती मंदिर येथे गाभाऱ्यात गर्दीचा फायदा घेत ३८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील ७०,००० रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीस गेले. पोलीस तपास सुरु आहे.

पावसाची शक्यता कायम

पुणे । प्रतिनिधी

वायव्य भारतातील वादळी प्रणालीमुळे कोकण, घाट आणि राज्यातील अनेक भागात हलका पाऊस सुरू आहे. मात्र, पावसाची तीव्रता कमी होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. ९ सप्टेंबर रोजी पूर्व विदर्भात विजांसह पावसाचा अंदाज असून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुण्यात शिवाजीनगर भागात ४.७ मिमी पावसाची नोंद झाली असून कमाल तापमान २८.२ अंश आहे. सातारा, कोल्हापूर, सांगली आणि पुणे घाटांमध्ये हलका पाऊस पडेल असा अंदाज आहे. सोलापूरमध्ये गेल्या काही दिवसांपासून सतत पावसामुळे तापमान ३३ अंशांवर पोहोचले आहे.

भांबुर्डा येथील बोगस संस्थेच्या नावाने भूखंड लाटला

गृहनिर्माण संस्थेत बांधकाम व्यवसायिकाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नावे; भारती विद्यापीठातील माजी कुलगुरू संस्थेचे प्रवर्तक

पुणे । प्रतिनिधी

भांबुर्डा, गोखले नगर येथील मेंढी फार्म जवळील सर्वे क्रमांक ९८ व ९९ च्या शेजारील महाराष्ट्र गृह निर्माण महामंडळाची (म्हाडा) ३२ हजार चौरस फुटाचा भूखंड भारती विद्यापीठाचे माजी कुलगुरू व एका दिवंगत माजी आमदाराने लाटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आले आहे. विशेष म्हणजे हा भूखंड ज्या बांधकाम व्यवसायिकाला विकसनासाठी दिले आहे त्या व्यावसायिकाच्या कार्यालयातील कर्मचारी गृह निर्माण मंडळाचे सभासद आहे. हा भूखंड अनुसूचित जाती व भटक्या विमुक्तांच्या सभासदांच्या नावाने हा भूखंड लाटला आहे. राजकीय पुढारी,म्हाडाचे पदाधिकारी व अधिकारी आणि बांधकाम व्यवसायिकांच्या संगनमताने हा भूखंड वाटल्याचे समोर आले आहे.

> **“ भांबुर्डा गोखलेनगर येथील सर्वे क्रमांक ९८ व ९९ ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ६० येथील सीमा भिंत तोडून बांधकाम व्यावसायिकाला ती पुन्हा आरसीसी मध्ये बांधण्यासाठी शिक्षण मंडळाकडूनच परवानगी देण्यात आली व सदर भिंती शेजारी नैसर्गिक उद्याचा प्रवाह वळवला जात आहे या सर्व गोष्टी सदर भूखंडा साठी केल्या गेल्या असून या ठिकाणी वनविभाग, पुणे महानगरपालिका, गृहनिर्माण विभाग म्हाडा, तसेच महसूल विभाग यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येत आहे. पुणे शहरातील हा मोठा भूखंड घोटाळा आहे.**
> **– समिर निकम , सामाजिक कार्यकर्ते**

भांबुर्डा येथील सर्वे क्रमांक ९८ व ९९ येथे भारत देसलडा या बांधकाम या बांधकाम व्यवसायिकाचे गृह प्रकल्पाचे काम सुरू आहे. येथील एका झाडाची अडचण संबंधीत बांधकाम व्यवसायिकाला होत होती. त्यामुळे चक्क वनखात्यानेच हे झाड तोडले होते. याची माहिती सामाजिक कार्यकर्ते समिर निकम यांना समजली पुणे शहरातील वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या डोळ्या देखत त्यांच्याच हद्दीतील वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत होती.

> **“ 'जिव्हाळा गृहनिर्माण संस्था (नियोजित) या संस्थेने २००६ भूखंडासाठी नियमित शुल्क एक कोटी ३५ लाख १३ हजार पाचशे रूपये भरले आहे. यासह संस्था २००९ मध्ये सहकार उपनिबंधक कार्यालयात नोंदणी करण्यात आली आहे. संस्थेत नियमाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त यांच्यांसह इतर सभासदांचा समावेश आहे.**
> **– भारत देसलडा , बांधकाम व्यवसायिक**

यासह येथील ओढ्याची दिशा बदलण्याचा प्रकार संबंधित बिल्डरकडून झाला होता. महापालिका बांधकाम विभागाने सुद्धा डोळेझाक करत याच्यावर कारवाई केली नव्हती. त्यामुळे निकम यांनी संबंधीत जागा व येथील गृहनिर्माण संस्थे बाबत माहिती घेण्यास सुरवात केली. यावेळी निकम यांना अनेक धक्कादायक प्रकारांची माहिती समोर आली.

जिव्हाळा गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत नसताना भारती विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू यांनी संस्थेचे प्रवर्तक असल्याचे दाखवून म्हाडाची तब्बल ३२ हजार चौरस फूटाचा भूखंडावर अनुसूचित जाती व भटक्या

पान ३ वर...

घरगुती गॅससिलेंडरमधुन अवैधरित्या गॅसचोरी करणाऱ्यांवर कारवाई

पुणे । प्रतिनिधी

वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील कर्मचारी हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. तपास पथकाचे पोलीस अंमलदार अमोल पिलाणे व अभिजित चव्हाण यांना त्यांचे बातमीदारांमार्फतीने बातमी मिळाली की, सुर्यलोकनगरी सोसायटीतील गार्डनसमोर वैदवाडी, हडपसर, पुणे येथे एका तीन चाकी पॅगोमध्ये दोनजण हे घरगुती गॅसच्या टाक्यांमधून इतर रिकाम्या गॅसच्या टाक्यांमध्ये

गॅस भरत असुन ते ज्वलनशिल व स्फोटक पदार्थ गैररित्याने हाताळुन मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल असे कृत्य करीत आहे.

तपास पथकातील कर्मचारी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. तेथे एका पिवळ्या रंगाच्या पॅगो टेम्पोक्र. यामध्ये एकजण आतुन घरगुती सिलेंडर गॅसला एक दोन्ही बाजुने रेग्युलटर असलेला पॉईप जोडुन दुसरे टोक दुसऱ्याच्या हाताने दुसऱ्या गॅससिलेंडरला जोडुन त्याद्वारे गॅस ट्रान्सफर करुन चोरी करताना आढळुन आले. त्या आरोपीना आहे त्या परिस्थीतीत ठेवून, नमुद गॅस ट्रान्सफर करणारे त्यांचे नाव पत्ते विचारले असता, विशेष पाईपच्या साहाय्याने गॅस ट्रान्सफर करणारे पंकज किसन सिंग ठाकुर, (वय २० वर्षे, रा. साडेसतरानगरळ अन्सारी

पान ३ वर...

पीएसआय परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेली अश्विनी केदारीचा दुर्दैवी मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

केवळ कष्ट आणि जिद्दीच्या जोरावर यश मिळवलेल्या आणि जिल्हाधिकारी होण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवलेल्या अश्विनी केदारी हिचा अकाली मृत्यू झाल्याने खेड तालुका आणि पुणे जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

अश्विनी केदारी (वय ३०, रा. पालू, ता. खेड, जि. पुणे) हिने

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या पीएसआय परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवत यश मिळवले होते. परंतु २८ ऑगस्ट रोजी सकाळी अभ्यास करताना तिने बाथरूममधील गिझर सुरू केला होता. पाणी तापमान पाहण्यासाठी आत गेल्यानंतर विजेचा धक्का बसला आणि त्याचवेळी अंगावर उकळते पाणी सांडल्याने तिच्या शरीराला गंभीर भाजल्या गेल्या. तब्बल ८० टक्के भाजल्यामुळे तिला तातडीने पिंपरी चिंचवड येथील

पान ३ वर...

'पुणे पत्रकार'च्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

पुणे । प्रतिनिधी

पुणे पत्रकार प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी दैनिक आज का आनंद चे शैलेश काळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. कार्यवाह पदावर दैनिक पुढारी चे पांडुरंग सांडभोर तर खजिनदार पदावर दैनिक महाराष्ट्र टाइम्स चे सुनीत भावे यांची निवड करण्यात आली.

प्रतिष्ठानच्या विश्वस्तपदासाठीची निवडणूक

२२ ऑगस्ट रोजी झाली होती. या निवडणुकीचे काम ॲड. प्रताप परदेशी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून पाहिले. त्यानंतर सोमवारी (दि. ८ सप्टेंबर) विश्वस्तांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते

पान ३ वर...

स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ मध्ये पुण्याला देशात दहावा क्रमांक

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयामार्फत देशभरातील १३५ शहरांमध्ये घेण्यात आलेल्या स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ मध्ये पुणे शहराने देशातील अव्वल १० शहरांमध्ये स्थान मिळवले आहे. महापालिकेच्या प्रयत्नांमुळे पुणे शहराला हवेच्या गुणवत्तेच्या दृष्टीने दहावा क्रमांक मिळाला असून महाराष्ट्रातील शहरांमध्ये पुणे सर्वाधिक म्हणजे २३ वे स्थान पटकावले आहे. गेल्या वर्षी पुण्याला ३३ वे स्थान मिळाले होते.

हा सर्वेक्षण एप्रिल २०२४ ते एप्रिल २०२५ या कालावधीत पार पडला. यात प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राबवलेल्या उपाययोजना, जनजागृती उपक्रम आणि नागरिकांचा सहभाग या निकषांचा विचार करण्यात आला होता.

पुणे महानगरपालिकेकडून सीएनजी व इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. पुण्यात सध्या ३३ हजारांहून अधिक इलेक्ट्रिक वाहने रस्त्यावर आहेत, तर सीएनजी बसेस आणि चार्जिंग स्टेशनची सोय देखील वाढवण्यात आली आहे. शहरातील चक्कीभट्टी बंदी, कचऱ्याचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन, तसेच औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना राबवण्यात आल्या.

या योजनेसाठी पुणे महानगरपालिकेला केंद्र सरकारकडून ८ कोटी रुपये निधी मिळाला. या निधीमधून एअर पॉल्युशन कंट्रोल (अझउ) सिस्टीम बसवण्यात आली असून धूर व धूळ प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यात यश आले आहे.

या यशाबद्दल महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, पुणेकरांच्या

पान ३ वर...

मनोरुग्णालयात व्यसनमुक्ती केंद्र लालफितीत

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील व्यसनाधीन आंतररुग्णांसाठी दोनशे खाटांचे व्यसनमुक्ती केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

महिला रुग्णांसाठी ५० तर पुरुष रुग्णांसाठी दीडशे खाटा असणार आहेत. मात्र, या जागी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असल्यामुळे व्यसनमुक्ती केंद्र लालफितीत अडकले आहे. त्यामुळे राज्याच्या अर्थसंकल्पात सव्वा कोटी रूपयांची तरतूद परत जाण्याची गेली.

मनोरुग्णालयात दाखल होणाऱ्या बाह्य व आंतररुग्ण विभागात व्यसनाधीन असलेल्या वीस टक्के रुग्णांचा समावेश आहे. सद्यस्थितीत

महिलांमध्ये सुद्धा व्यसनाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे सुरवातीला रुग्णालयातील महिला व पुरुष विभागात व्यसनमुक्ती केंद्र सुरू करीत आहोत. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सव्वा कोटी रूपयांचे अंदाजपत्रक तयार करून ते राज्याच्या अर्थसंकल्पात सादर केले होते. मात्र, ज्याठिकाणी व्यसनमुक्ती केंद्र प्रस्तावित आहे त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळे व्यसनमुक्ती केंद्र लांबणीवर

पान ३ वर...

व्यसनाधीनांवर मोफत उपचार

मनोरुग्णालयाच्या कर्मचारी वसाहतीशेजारी स.न. १५९ जागेवर किंवा केंद्रिय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) च्या पाठिमागे असलेल्या मनोरुग्णालयाच्या जागेत सामाजिक न्याय विभागाच्या वतीने व्यसनमुक्ती केंद्र उभारले जाणार आहे. यासंदर्भात आमदार सुनिल टिंगरे आणि आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत मागणी केली होती. त्यामुळे लवकरच याठिकाणी व्यसनमुक्ती केंद्र उभारले जाणार आहे. त्यामुळे व्यसनाधीन युवकांवर मोफत उपचार होतील. त्यांना बाहेरील उपचार केंद्रात हजारो रूपये खर्च करावे लागणार नसल्याचे टिंगरे यांनी सांगितले.

> **“ मनोरुग्णालयात व्यसनमुक्ती केंद्र झाल्यामुळे रुग्णालयातील वैद्यकीय व मानसिक सोयीसुविधा सहज उपलब्ध होतील. वैद्यकीय सेवेचा खर्च वगळता फक्त न्याहरी, भोजनाचा खर्च होईल. खासगी रुग्णालयातील खर्च टाळून कमी खर्चात युवकांना व्यसनमुक्त करता येईल. मात्र, मनोरुग्णालयाच्या जागेतील अतिक्रमणे काढुन टाकल्यास व्यसनमुक्ती केंद्र होऊ शकते.**
> **– डॉ. श्रीनिवास कोलाड,**
> **प्रभारी अधिक्षक, येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय**

डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी पुलाच्या कामासाठी भिडे पूल वाहतुकीसाठी बंद

पुणे । प्रतिनिधी

वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गावरील छत्रपती संभाजी उद्यान आणि डेक्कन जिमखाना या महत्त्वाच्या मेट्रो स्थानकांना पुण्याच्या मध्यवर्ती पेठ भागाशी जोडण्यासाठी पादचारी पूल बांधले जात आहेत. छत्रपती संभाजी उद्यान स्थानकाला पेठ भागाशी जोडणाऱ्या पुलाचे उद्घाटन नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले असून, हा पूल नागरिक आणि मेट्रो प्रवाशांसाठी वापरासाठी खुला झाला आहे. दरम्यान, डेक्कन जिमखाना मेट्रो

पान ३ वर...